श्रीमद् भागवत का यह सार
भगवद् भक्ति ही आधार

# श्रीमद्भागवत रसिक कुटुंब

## श्रीमद्भगवद्गीता तृतीय अध्याय



**पार्थ सारथी ने समझाया धर्म -कर्म का ज्ञान,**
**मानव जीवन सफल बना ले गीता अमृत मान।**

**नारायणं(न्) नमस्कृत्य, नरं(ञ्) चैव नरोत्तमम्।**

**देवीं(म्) सरस्वतीं(वँ) व्यासं(न्), ततो जयमुदीरयेत्**

अन्तर्यामी नारायण स्वरूप भगवान् श्रीकृष्ण, (उनके नित्य सखा) नरस्वरूप नरश्रेष्ठ अर्जुन,(उनकी लीला प्रकट करनेवाली) भगवती सरस्वती और (उन लीलाओं का संकलन करनेवाले) महर्षि वेदव्यास को नमस्कार करके जय के साधन वेद-पुराणों का पाठ करना चाहिये।

**नामसङ्कीर्तनं(यँ) यस्य, सर्वपापप्रणाशनम्।**

**प्रणामो दुःखशमनस्, तं(न्) नमामि हरिं(म्) परम्**

जिन भगवान के नामों का संकीर्तन सारे पापों को सर्वथा नष्ट कर देता है और जिन भगवान के चरणों में आत्मसमर्पण, उनके चरणों में प्रणति सर्वदा के लिए सब प्रकार के दुःखों को शांत कर देती है, उन्हीं परम -तत्वस्वरूप श्रीहरि को मैं नमस्कार करता हूं।

**श्रीमद्भगवद्गीतायां(न्)**

**तृतीयोऽध्याय:**

**अर्जुन उवाच**

**ज्यायसी चेत्कर्मणस्ते, मता बुद्धिर्जनार्दन ।**

**तत्किं(ङ्) कर्मणि घोरे मां(न्), नियोजयसि केशव ॥ 1 ॥**

अर्जुन म्हणाला -हे जनार्दना !जर तुम्हाला करमाहून ज्ञान श्रेष्ठ वाटते ,तर मग हे केशवा !मला भयंकर कर्म करण्यास का प्रवृत्त करीत आहात ?

**व्यामिश्रेणेव वाक्येन, बुद्धिं(म्) मोहयसीव मे ।**

**तदेकं(वँ) वद निश्चित्य, येन श्रेयोऽहमाप्नुयाम् ॥ 2 ॥**

तुम्ही मिश्रित शाभाषणाने माझ्या बुद्धीला जणू मोहित करीत आहात .म्हणून अशी एकच गोष्ट निश्चित करून मला सांगा की ,ज्यामुळे माझे कल्याण होईल .

**श्रीभगवानुवाच**

**लोकेऽस्मिन्द्विविधा निष्ठा, पुरा प्रोक्ता मयानघ ।**

**ज्ञानयोगेन साङ्ख्यानां(ङ्), कर्मयोगेन योगिनाम् ॥ 3 ॥**

श्री भगवान म्हणाले -हे निष्पापा !या जगात दोन प्रकारची निष्ठा माझ्याकडून पूर्वी सांगितली गेली आहे .त्यातील सांख्य योग्यांचीनिष्ठा ज्ञान आयोगाने व योग्यांची निष्ठा कर्म योगाने होते .

**न कर्मणामनारम्भान्-नैष्कर्म्यं(म्) पुरुषोऽश्नुते ।**

**न च सन्न्यसनादेव, सिद्धिं(म्) समधिगच्छति ॥ 4 ॥**

मनुष्य कर्मे केल्याशिवाय निष्कर्मतेला म्हणजेच योगनिष्ठा प्राप्त होत नाही आणि कर्माचा फक्त त्याग केल्याने तो सिद्धीला म्हणजेच सांख्यनिष्ठेला प्राप्त होत नाही .

**न हि कश्चित्क्षणमपि, जातु तिष्ठत्यकर्मकृत् ।**

**कार्यते ह्यवशः(ख्) कर्म, सर्वः(फ्) प्रकृतिजैर्गुणैः ॥ 5 ॥**

निःसंशयपणेकोणीही मनुष्य कोणत्याही वेळी क्षणभर सुद्धा काम न करता राहात नाही.कारण सर्व मनुष्य समुदाय प्रकृती पासून उत्पन्न झालेल्या गुणांमुळे पराधीन असल्यामुळे कर्म करायला भाग पाडला जातो .

**कर्मेन्द्रियाणि सं(यँ)यम्य, य आस्ते मनसा स्मरन् ।**

**इन्द्रियार्थान्विमूढात्मा, मिथ्याचारः(स्) स उच्यते ॥ 6 ॥**

जो मूर्ख मनुष्य सर्व इंद्रिये बळेच वर वर आवरून मनाने त्या इंद्रियांच्या विषयांचे चिंतन करीत राहतो ,तो मिथ्याचारी म्हणजे दांभिक म्हटला जातो .

**यस्त्विन्द्रियाणि मनसा, नियम्यारभतेऽर्जुन ।**

**कर्मेन्द्रियैः(ख्) कर्मयोग-मसक्तः(स्) स विशिष्यते ॥ 7 ॥**

परंतु हे अर्जुना !जो मनुष्य मनाने इंद्रियांना ताब्यात ठेवून अशक्त न होता सर्व इंद्रियांच्या द्वारा कर्मयोगाचे आचरण करतो ,तो श्रेष्ठ होय .

**नियतं(ङ्) कुरु कर्म त्वं(ङ्), कर्म ज्यायो ह्यकर्मणः।**

**शरीरयात्रापि च ते, न प्रसिद्ध्येदकर्मणः ॥ 8 ॥**

तू शास्त्र विहित कर्तव्य कर्म कर .कारण कर्म न करण्यापेक्षा कर्म करणे श्रेष्ठ आहे .तसेच कर्म न करण्याने तुझे शरीर व्यवहार ही चालणार नाही त .

यज्ञार्थात्कर्मणोऽन्यत्र, लोकोऽयं(ङ्) कर्मबन्धनः ।
तदर्थं(ङ्) कर्म कौन्तेय, मुक्तसं(ङ्)गः(स्) समाचर ॥ 9 ॥

यज्ञा निमित्त केल्या जाणाऱ्या कर्मांशिवाय दुसऱ्या करमात गुंतलेला हा मनुष्य समुदायक र्मांनी बांधला जातो .म्हणून हे अर्जुना !तू असती सोडून यज्ञासाठी उत्तम प्रकारे कर्तव्य कर्म कर .

सहयज्ञाः(फ्) प्रजाः(स्) सृष्ट्वा, पुरोवाच प्रजापतिः ।
अनेन प्रसविष्यध्व-मेष वोऽस्त्विष्टकामधुक् ॥ 10 ॥

प्रजापती ब्रह्मदेवाने कल्पारंभी यज्ञासह प्रजा उत्पन्न करून त्यांना सांगितले की 'तुम्ही या यज्ञाच्या द्वारा उत्कर्ष करून घ्या आणि हा यज्ञ तुमचे इच्छित मनोरथ पूर्ण करणारा होवो .

देवान्भावयतानेन, ते देवा भावयन्तु वः ।
परस्परं(म्) भावयन्तः(श्), श्रेयः(फ्) परमवाप्स्यथ ॥ 11 ॥

तुम्ही या यज्ञाने देवतांची पुष्टी करा आणि त्या देवतांनी तुम्हाला पुष्ट करावे .अशा प्रकारे निस्वार्थीपणाने एकमेकांची उन्नती करीत तुम्ही परम कल्याणाला प्राप्त व्हाल .

इष्टान्भोगान्हि वो देवा, दास्यन्ते यज्ञभाविताः ।
तैर्दत्तानप्रदायैभ्यो, यो भुङ्क्ते स्तेन एव सः ॥ 12 ॥

यज्ञाने पुष्ट झालेल्या देवता तुम्हाला न मागताही इच्छित भोग खात्रीने देत राहतील .अशा रीतीने त्या देवतांनी दिलेले भोग त्यांना अर्पण न करता जो पुरुष स्वतः खातो ,तो चोरच होय .

यज्ञशिष्टाशिनः(स्) सन्तो, मुच्यन्ते सर्वकिल्बिषैः ।
भुञ्जते ते त्वघं(म्) पापा, ये पचन्त्यात्मकारणात् ॥ 13 ॥

यज्ञ करून शिल्लक राहिलेले अन्न खाणारे श्रेष्ठ पुरुष सर्व पापांपासून मुक्त होतात .पण जे पापी लोक स्वतःच्या शरीर -पोषणासाठी अन्न शिजवतात ,ते तर पापच खातात .

अन्नाद्भवन्ति भूतानि, पर्जन्यादन्नसम्भवः ।
यज्ञाद्भवति पर्जन्यो, यज्ञः(ख्) कर्मसमुद्भवः ॥ 14 ॥
कर्म ब्रह्मोद्भवं(वँ) विद्धि, ब्रह्माक्षरसमुद्भवम् ।
तस्मात्सर्वगतं(म्) ब्रह्म, नित्यं(यँ) यज्ञे प्रतिष्ठितम् ॥ 15 ॥

सर्व प्राणी अन्नापासून उत्पन्न होतात .अन्न निर्मिती पावसापासून होते .पाऊस यज्ञामुळे पडतो आणि यज्ञविहितकर्मामुळे घडतो .कर्म समुदाय वेदांपासून व वेद अविनाशी परमात्म्यापासून उत्पन्न झालेले आहेत ,असे समज .यावरून हेच सिद्ध होते की,सर्वव्यापी परम अक्षर परमात्मा नेहमीच यज्ञात प्रतिष्ठित असतो .

**एवं(म्) प्रवर्तितं(ञ्) चक्रं(न्), नानुवर्तयतीह यः ।**

**अघायुरिन्द्रियारामो, मोघं(म्) पार्थ स जीवति ॥ 16 ॥**

हे पार्था !जो पुरुष या जगात अशा प्रकारे परंपरेने चालू असलेल्या सृष्टीचक्राला अनुसरून वागत नाही ,म्हणजेच आपल्या कर्तव्याचे पालन करीत नाही,तो इंद्रियांच्या द्वारा भोगात रमणारा पापी आयुष्य असलेला पुरुष व्यर्थ जगतो .

**यस्त्वात्मरतिरेव स्या-दात्मतृप्तश्च मानवः ।**

**आत्मन्येव च सन्तुष्टस्-तस्य कार्यं(न्) न विद्यते ॥ 17 ॥**

परंतु जो मनुष्य आत्म्यातच रमणारा,आत्म्यातच तृप्त आणि आत्म्याचा संतुष्ट असतो,त्याला कोणतेच कर्तव्य उरत नाही .

**नैव तस्य कृतेनार्थो, नाकृतेनेह कश्चन ।**

**न चास्य सर्वभूतेषु, कश्चिदर्थव्यपाश्रयः ॥ 18 ॥**

त्या महापुरुषाला या विश्वात कर्मे करण्याने काही प्रयोजन असत नाही .तसेच कर्मे न करण्याने ही काही प्रयोजन असत नाही .तसेच सर्व प्राणीमात्रातही त्याचा जरा देखील स्वार्थाचा संबंध असत नाही .

**तस्मादसक्तः(स्) सततं(ङ्), कार्यं(ङ्) कर्म समाचर ।**

**असक्तो ह्याचरन्कर्म, परमाप्नोति पूरुषः ॥ 19 ॥**

म्हणून तू नेहमी अशक्त न होता कर्तव्य कर्म नीट करीत रहा .कारण असती सोडून कर्म करणारा मनुष्य परमात्म्याला जाऊन मिळतो .

**कर्मणैव हि सं(म्)सिद्धि-मास्थिता जनकादयः ।**

**लोकसं(ङ्)ग्रहमेवापि, सम्पश्यन्कर्तुमर्हसि ॥ 20 ॥**

जनकाधी ज्ञानी लोकही आसक्तिरहितकर्मानेच परमसिद्धीला प्राप्त झाले होते .म्हणून तसेच लोकसंग्रहाकडे दृष्टी देऊन देखील तू कर्म करणे च योग्य .

**यद्यदाचरति श्रेष्ठस्-तत्तदेवेतरो जनः ।**

**स यत्प्रमाणं(ङ्) कुरुते, लोकस्तदनुवर्तते ॥ 21 ॥**

श्रेष्ठ पुरुष जे जे आचरण करतो ,त्या त्याप्रमाणेच इतर लोकही आचरण करतात .तो जे काही प्रमाण म्हणून सांगतो ,त्याप्रमाणेच सर्व मनुष्य समुदाय वागू लागतो .

**न मे पार्थास्ति कर्तव्यं(न्), त्रिषु लोकेषु किं(ञ्)चन ।**

**नानवाप्तमवाप्तव्यं(वँ), वर्त एव च कर्मणि ॥ 22 ॥**

हे अर्जुना ! मला या तिन्ही लोकांतकाहीही कर्तव्य नाही आणि मिळवण्याजोगी कोणतीही वस्तू मिळाली नाही ,असे नाही .तरीही मी कर्म करीतच असतो .

यदि ह्यहं(न्) न वर्तेयं(ञ्), जातु कर्मण्यतन्द्रितः ।

मम वर्त्मानुवर्तन्ते, मनुष्याः(फ्) पार्थ सर्वशः ॥ 23 ॥

कारण हे पार्था !जर का मी सावध राहून करणे केली नाहीत ,तर मोठे नुकसान होईल .कारण मनुष्य सर्व प्रकारे माझ्याच मार्गाचे अनुसरण करतात .

उत्सीदेयुरिमे लोका, न कुर्यां(ङ्) कर्म चेदहम् ।

सं(ङ्)करस्य च कर्ता स्या-मुपहन्यामिमाः(फ्) प्रजाः ॥ 24 ॥

म्हणून जर मी कर्म केले नाही ,तर ही सर्व माणसे नष्ट भ्रष्ट होतील आणि मी संकरतेचे कारण होईन .तसेच या सर्व प्रजेचा घात करणारा होईन .

सक्ताः(ख्) कर्मण्यविद्वां(म्)सो, यथा कुर्वन्ति भारत ।

कुर्याद्विद्वां(म्)स्तथासक्तश्-चिकीर्षुर्लोकसं(ङ्)ग्रहम् ॥ 25 ॥

हे भारता ! कर्मांतआसक्त असलेले अज्ञानी लोक ज्या रीतीने कर्मेंकरतात ,त्याच रीतीने आसक्ती नसलेल्या विद्वानाने ही लोकसंग्रह करण्याच्या इच्छेने कर्म करावीत .

न बुद्धिभेदं(ञ्) जनये-दज्ञानां(ङ्) कर्मसङ्गिनाम् ।

जोषयेत्सर्वकर्माणि, विद्वान्युक्तः(स्) समाचरन् ॥ 26 ॥

परमात्मा स्वरूपात स्थिर असलेल्या स्थिर असलेल्या ज्ञानी पुरुषाने शास्त्र विहित कर्मांत आसक्ती असलेल्या अज्ञानी लोकांच्या बुद्धीत भ्रम म्हणजेच कर्मा विषयी अश्रद्धा निर्माण करू नये .उलट स्वतः शास्त्र विहित सर्व कर्म उत्तम प्रकारे करीत त्यांच्याकडूनही तशीच करून घ्यावी .

प्रकृतेः(ख्) क्रियमाणानि, गुणैः(ख्) कर्माणि सर्वशः ।

अहं(ङ्)कारविमूढात्मा, कर्ताहमिति मन्यते ॥ 27 ॥

वास्तविक सर्व कर्मे सर्व प्रकारे प्रकृतीच्या गुणांमार्फत केली जातात .तरीही ज्याचे अंत :करण अहंकाराने मोहित झाले आहे ,असा अज्ञानी पुरुष मी कर्ता आहे ' असे मानतो .

तत्त्ववित्तु महाबाहो, गुणकर्मविभागयोः ।

गुणा गुणेषु वर्तन्त, इति मत्वा न सज्जते ॥ 28 ॥

पण हे महाबाहो !गुणविभाग आणि कर्म विभाग यांचे तत्त्व जाणणारा ज्ञानयोगी सर्व गुणच गुणांत वावरत असतात ,हे लक्षात घेऊन त्यामध्ये अशक्त होत नाही .

प्रकृतेर्गुणसम्मूढाः(स्), सज्जन्ते गुणकर्मसु ।

तानकृत्स्नविदो मन्दान्-कृत्स्नविन्न विचालयेत् ॥ 29 ॥

प्रकृतीच्या गुणांनी अत्यंत मोहित झालेली माणसे गुणांत आणि कर्मांत आसक्त होतात . त्या चांगल्या रीतीने न जाणाऱ्या मंदबुद्धीच्या अज्ञान्यांचा पूर्ण ज्ञान असणाऱ्या ज्ञान्यानेबुद्धिभेद करू नये .

**मयि सर्वाणि कर्माणि, सं(न्)न्यस्याध्यात्मचेतसा ।**

**निराशीर्निर्ममो भूत्वा, युध्यस्व विगतज्वरः ॥ 30 ॥**

अंतर्यामी मज परमात्म्यामध्ये गुंतलेल्या चित्ताने सर्व करणे मला समर्पण करून आशा ,ममता व संताप रहित होऊन तू युद्ध कर .

**ये मे मतमिदं(न्) नित्य-मनुतिष्ठन्ति मानवाः ।**

**श्रद्धावन्तोऽनसूयन्तो, मुच्यन्ते तेऽपि कर्मभिः ॥ 31 ॥**

जे कोणी मानव दोषदृष्टी टाकून श्रद्धायुक्त अंतःकरणाने माझ्या या मताचे नेहमी अनुसरण करतात ,तेही सर्व कर्मांपासून मुक्त होतात .

**ये त्वेतदभ्यसूयन्तो, नानुतिष्ठन्ति मे मतम् ।**

**सर्वज्ञानविमूढां(म्)स्तान्-विद्धि नष्टानचेतसः ॥ 32 ॥**

परंतु ,जे मानव माझ्यावर दोषारोप करून माझ्या या मतानुसार वागत नाहीत ,त्या मूर्खांना तू सर्व ज्ञानांना मुकलेले आणि नष्ट झालेलेच समज .

**सदृशं(ञ्) चेष्टते स्वस्याः(फ्), प्रकृतेर्ज्ञानवानपि ।**

**प्रकृतिं(य्ँ) यान्ति भूतानि, निग्रहः(ख्) किं(ङ्) करिष्यति ॥ 33 ॥**

सर्व प्राणी प्रकृतीच्या वळणावर जातात म्हणजेच आपल्या स्वभावाच्या अधीन होऊन कर्मे करतात .ज्ञानी सुद्धा आपल्या स्वभावानुसारच व्यवहार करतो .मग या विषयांत कोणाचाही हट्टीपणा काय करेल ?

**इन्द्रियस्येन्द्रियस्यार्थे, रागद्वेषौ व्यवस्थितौ ।**

**तयोर्न वशमागच्छेत्-तौ ह्यस्य परिपन्थिनौ ॥ 34 ॥**

प्रत्येक इंद्रियाचे इंद्रियाच्या विषयात राग व द्वेष लपलेले असतात .माणसाने त्या दोहोंच्या आहारी जाता कामा नये .कारण ते दोन्हीही त्याच्या कल्याण मार्गात विघ्न करणारे मोठे शत्रू आहेत .

**श्रेयान्स्वधर्मो विगुणः(फ्), परधर्मात्स्वनुष्ठितात् ।**

**स्वधर्मे निधनं(म्) श्रेयः(फ्), परधर्मो भयावहः ॥ 35 ॥**

चांगल्या प्रकारे आचरणात आणलेल्या दुसऱ्याच्या धर्माहुन गुण रहित असला तरी आपला धर्म अतिशय उत्तम आहे .आपल्या धर्मात तर मरणे ही कल्याणकारक आहे .पण दुसऱ्याचा धर्म भय देणारा आहे .

**अर्जुन उवाच**

**अथ केन प्रयुक्तोऽयं(म्), पापं(ञ्) चरति पूरुषः ।**

**अनिच्छन्नपि वार्ष्णेय, बलादिव नियोजितः ॥ 36 ॥**

अर्जुन म्हणाला -हे कृष्णा !तर मग हा मनुष्य स्वतःची इच्छा नसतानाही जबरदस्तीने करावयास लावल्याप्रमाणे कोणाच्या प्रेरणेने पापाचे आचरण करतो ?

**श्रीभगवानुवाच**

**काम एष क्रोध एष, रजोगुणसमुद्भवः ।**

**महाशनो महापाप्मा, विद्ध्येनमिह वैरिणम् ॥ 37 ॥**

श्री भगवान म्हणाले - रजोगुणापासूनउत्पन्न झालेला हा कामच क्रोध आहे .हा खूप खादाड अर्थात भोगांनी कधी ही तृप्त न होणारा व मोठा पापी आहे .हाच या विषयातील वैरी आहे ,असे तु जाण .

**धूमेनाव्रियते वह्निर्-यथादर्शो मलेन च।**

**यथोल्बेनावृतो गर्भस्-तथा तेनेदमावृतम् ॥ 38 ॥**

ज्याप्रमाणे धुराने अग्नी ,धुळीने आरसा आणि वारेने गर्भझाकला जातो ,त्याचप्रमाणे त्या कामामुळे हे ज्ञान अच्छादित राहते .

**आवृतं(ञ्) ज्ञानमेतेन, ज्ञानिनो नित्यवैरिणा ।**

**कामरूपेण कौन्तेय, दुष्पूरेणानलेन च ॥ 39 ॥**

आणि हे अर्जुना !कधीही तृप्त न होणारा हा का मरूप अग्नी ज्ञानी माणसाचा कायमचा शत्रू आहे .त्याने माणसांचे ज्ञान झाकले आहे .

**इन्द्रियाणि मनो बुद्धि-रस्याधिष्ठानमुच्यते ।**

**एतैर्विमोहयत्येष, ज्ञानमावृत्य देहिनम् ॥ 40 ॥**

इंद्रिये ,मन आणि बुद्धी ही याचे निवासस्थान म्हटली जातात .हा काम या मन ,बुद्धी आणि इंद्रियांच्या द्वारा ज्ञानाला आच्छादित करून जिवात्म्यालामोहित करतो .

**तस्मात्त्वमिन्द्रियाण्यादौ, नियम्य भरतर्षभ ।**

**पाप्मानं(म्) प्रजहि ह्येनं(ञ्), ज्ञानविज्ञाननाशनम् ॥ 41 ॥**

म्हणून हे अर्जुना !तू प्रथम इंद्रियांवर ताबा ठेवून या ज्ञान आणि विज्ञान यांचा नाश करणाऱ्या ,मोठ्या पापी कामाला अवश्य बळेच मारून टाक .

**इन्द्रियाणि पराण्याहु-रिन्द्रियेभ्यः(फ्) परं(म्) मनः ।**

**मनसस्तु परा बुद्धिर्-यो बुद्धेः(फ्) परतस्तु सः ॥ 42 ॥**

इंद्रियांना स्थूल शरीराहून पर म्हणजे श्रेष्ठ ,बलवान आणि सूक्ष्म म्हटले जाते .या इंद्रियांहून मन पर आहे .मनाहून बुद्धी पर आहे .आणि जो बुद्धी हूनही अत्यंत पर आहे ,तो आत्मा होय .

**एवं(म्) बुद्धेः(फ्) परं(म्) बुद्ध्वा, सं(म्)स्तभ्यात्मानमात्मना ।**

**जहि शत्रुं(म्) महाबाहो, कामरूपं(न्) दुरासदम् ॥ 43 ॥**

अशाप्रकारे बुद्धीहून पर अर्थात सूक्ष्म ,बलवान व अत्यंत श्रेष्ठ असा आत्मा आहे,हे जाणून आणि बुद्धीच्या द्वारा मनाला स्वाधीन करून हे महाबाहो !तू या का मरूप अजिंक्य शत्रूला मारून टाक .

**इति श्रीमहाभारते भीष्मपर्वणि श्रीमद्भगवद्गीतापर्वणि**

**श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां(यँ)**

**योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसं(वँ)वादे कर्मयोगो नाम तृतीयोऽध्यायः ॥**

**ॐ पूर्णमदः(फ्) पूर्णमिदं(म्)पूर्णात्पूर्णमुदच्यते**

**पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णमेवावशिष्यते ।।**

**ॐ शांतिः(श्)शांतिः(श्)शांतिः।।**

वह सच्चिदानंदघन परब्रह्म सभी प्रकार से सदा सर्वदा परिपूर्ण है। यह जगत भी उस परमात्मा से पूर्ण ही है, क्योंकि यह पूर्ण उस पूर्ण पुरुषोत्तम से ही उत्पन्न हुआ है। इस प्रकार परब्रह्म की पूर्णता से जगत पूर्ण होने पर भी वह परब्रह्म परिपूर्ण है। उस पूर्ण में से पूर्ण को निकाल देने पर भी वह पूर्ण ही शेष रहता है।